वाचले : १. या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक एफएलआर ११८८/२७५३३/ ११ब
दि २९.११.८८

२. या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक एफएलआर २०००/एलएबी/५ब
दि १४.२.२०००.

---

## परिपत्रक

क्रमांक सीएलआर ११२००२ / लेबल / ५ब

१८ एप्रिल २००२

२. महाराष्ट्र डिस्टीलेशन ऑफ स्पिरीट ॲन्ड मॅन्युफॅक्चर ऑफ पोटेबल लिकर रुल्स, १९६६ चा नियम १७(२३), दि महाराष्ट्र मॅन्युफॅक्चर ऑफ बीअर ॲन्ड वाईन रुल्स, १९६६ चा नियम ११(४) तसेच दि महाराष्ट्र देशी दारु नियमावली १९७३ चा नियम ६(२४) मधील तरतुदीनुसार अनुक्रमे विदेशी मद्य, बिअर व देशी मद्याच्या बाटल्यांवर लावण्यात यावयाची लेबले आयुक्तांकडून मंजूर करुन घेणे आवश्यक आहे.

३. या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, मद्य उत्पादक विविध ब्रॅन्डस्च्या नावाची लेबल्स मंजूर करुन घेतात. लेबल मंजूरीनंतर अल्पकाळ मद्याचे उत्पादन करुन नंत दिर्घकाळ / वर्षानुवर्षे सदर ब्रॅंडच्या मद्याचे उत्पादन करत नाहीत. अशा प्रावृत्तीस आळा घालण्याच्या दृष्टिकोनातून मद्याच्या ज्या ब्रॅंडचे उत्पादन २ वर्षापेक्षा अधिक काळ बंद असेल तर सदर ब्रॅंडची मंजूरी आपोआप रद्द करण्याचा व या पुढे फक्त सदर अटीवरच लेबल्स मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तरी आपणांस कळविण्यात येते की आपल्या ज्या ब्रॅंडचे उत्पादन गेल्या २ वर्षापेक्षा अधिक काळा पासून बंद आहे त्या ब्रॅंडचा वापर हे परिपत्रक निर्गमित झाल्यापासून तीन महिन्याच्या आत सुरु करावा व त्याची माहिती हे परिपत्रक आपणांस प्राप्त झाल्यापासून २ आठवडयाच्या आत अधीक्षकांमार्फत सादर करावी. तसेच वरील प्रमाणे लेबलांचा वापर विहित कालावधीत

न केल्यास सदर लेबल्सची मंजूरी रद्द का करण्यात येऊ नये या संदर्भात खुलासे उपरोक्त मुदती नंतर तात्काळ सादर करण्यात यावेत, ही विंनती सदर कालावधीत आपण लेबल्सचा नियमीत वापर सुरु न केल्यास किंवा खुलासा सादर न केल्यास उपरोक्त कालावधी नंतर आपली एप्रिल २००० पासून वापरात नसलेली बँडसची मंजूरी आपोआप रद्द होईल याची नोंद घ्यावी.

(ए. रामकृष्णंन्)
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क
महाराष्ट्र राज्य, मुंबईकरिता

प्रति,

१) सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क

२) सर्व अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क

३) सर्व पीएलएल, बीआरएल, सीएल-१, अनुज्ञप्तीधारक

४) सर्व पीएलएल, बीआरएल, सीएल-१, अनुज्ञप्तीवरील प्रभारी अधिकारी

प्रभारी अधिका-यांना सुचना देण्यात येत आहेत की, घटकास मंजूर केले ज्या लेबलचा वापर २ वर्षे व त्या पेक्षा जास्त कालावधी पासून बंद आहे त्या लेबलाची पडताळणी करण्यात यावी व त्याबाबतची माहिती या कार्यालयास सादर करावी.

५) या कार्यालयाचे सर्व राजपत्रित अधिकारी

६) अभिलेख शाखा (५ प्रती)